**RNI No. MAHBIL /2009/35530**
**Reg. No. MH/MR/South-341/2011-13**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक १२] मंगळवार, जुलै २, २०१३/आषाढ ११, शके १९३५ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २४**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.**—महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. | पृष्ठे १-५ |

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ जुलै २०१३.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2013.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SELF-FINANCED SCHOOLS (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2012.

**सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.**

**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

२०१३ चा महा. १. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१३, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) मध्ये,— २०१३ चा महा. १.

(१) खंड (च) वगळण्यात येईल ;

(२) खंड (ठ) मध्ये "पूर्व-प्राथमिक शाळा," हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(१) विद्यमान कलम ३ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ;

(२) "पूर्व-प्राथमिक किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(३) "३० जून" या मजकुराऐवजी "३१ जुलै" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

"(२) शासनाला, पात्रतेबाबत घोषणा करणे, इरादा पत्र व मान्यता पत्र देण्यासह पोट-कलम (१) खाली प्राप्त झालेल्या अर्जावर प्रक्रिया करण्याच्या कार्यपद्धतीचे तपशील विहित करता येतील.

(३) जर विकास आराखड्यामध्ये, सक्षम प्राधिकरणाने अनुसूची 'क' च्या नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड शैक्षणिक प्रयोजनांसाठी राखून ठेवलेला असेल तर, अशा बाबतीत शासनास, नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीच्या क्षेत्रासंबंधातील अट शिथिल करता येईल :

परंतु, २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षाकरिता अशी शिथीलता भूतलक्षीप्रभावाने करता येईल.

(४) अनुसूची 'क' च्या नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीच्या क्षेत्रासंबंधातील अट बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या अन्वये आवश्यक असलेली मानके व प्रमाणके यांचे अनुपालन करणाऱ्या शाळांच्या दर्जावाढीच्या प्रस्तावांना लागू असणार नाही. २००९ चा ३५.

(५) कोणत्याही नोंदणीकृत न्यासाने किंवा नोंदणीकृत संस्थेने किंवा स्थानिक प्राधिकरणाने पोट-कलम (१) अन्वये नवीन शाळा स्थापन करण्याकरिता अर्ज सादर केला असेल आणि अनुसूची 'क' च्या नोंद (११) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नोंदणीकृत दस्तऐवजा व्यतिरिक्त सर्व अटींचे अनुपालन केले असेल अशा बाबतीत, जर अशा न्यासाने किंवा संस्थेने किंवा स्थानिक प्राधिकरणाने संबंधित यथोचित नोंदणीकृत दस्तऐवज इरादा पत्र देण्यापूर्वी सादर केले असतील तर, शासनास, अर्ज केलेली नवीन शाळा स्थापन करण्यासाठी परवानगी देता येईल :

परंतु, २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षाकरिता असे संबंधित यथोचित नोंदणीकृत दस्तऐवज १५ जुलै २०१३ पूर्वी सादर करण्यात येतील.".

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (१) मधील "दाननिधी निर्मितीसाठी" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "तारण म्हणून ठेवावी लागेल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"अनुसूची 'ग' मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम कोणत्याही बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवावी लागेल. तथापि, इरादा पत्र देण्यात येण्यापूर्वी, उक्त रक्कम ही दाननिधी निर्माण करण्यासाठीची प्रतिभूती ठेव म्हणून व्यवस्थापन आणि संबंधित जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरित्या, राष्ट्रीय बचत

प्रमाणपत्राच्या स्वरूपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरुपात ठेवण्यात येईल; असे प्रमाणपत्र किंवा अशी ठेव संबंधित जिल्हा शिक्षण अधिकाऱ्याकडे तारण म्हणून ठेवण्यात येईल. असे प्रमाणपत्र किंवा अशी ठेव पुढील नवीकरणाच्या अटीच्या अधीनतेने, किमान तीन वर्षाच्या कालावधीसाठी ठेवण्यात येईल :

परंतु, २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षाकरिता, अशी रक्कम १५ जुलै २०१३ पूर्वी राष्ट्रीयीकृत बँकेत ठेव म्हणून ठेवण्यात येईल, या अटीच्या अधिन, शासनास संयुक्त ठेवीची अट शिथिल करता येईल.".

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये "३१ ऑक्टोबर" या मजकुराऐवजी "३० सप्टेंबर" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये "हरकती व सूचना कोणत्याही असल्यास, त्यासह" या मजकुरानंतर "शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) याच्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, शासनास, यथायोग्य पडताळणी केल्यानंतर व त्याबाबतची कारणे नोंदवून, २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षासह अशा कोणत्याही निर्णयाचे पुनर्विलोकन करता येईल.".

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "त्या शैक्षणिक वर्षाच्या १ मे" या मजकुराऐवजी "कलम ३ मध्ये निर्देशिलेल्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या अनुसूची 'क' ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या अनुसूची 'क' मध्ये,—

(१) नोंद (२) मधील, "पूर्व-प्राथमिक किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(२) नोंद (५) मधील, "प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक" या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"प्राथमिक ते उच्च प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक ते माध्यमिक किंवा माध्यमिक ते उच्च माध्यमिक";

(३) नोंद (११) मध्ये,—

(क) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क) नोंदणीकृत न्यासाच्या किंवा नोंदणीकृत संस्थेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या नावे असलेली जमीन." ;

(ख) खंड (ग) वगळण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या अनुसूची 'ग' ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या अनुसूची 'ग' मध्ये, नोंद (क) मधील, "किंवा प्राथमिक शाळेला संलग्न असलेली पूर्व-प्राथमिक" हा मजकूर वगळण्यात येईल.

## निवेदन

स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासह विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी आणि प्रमाणके ठरविणे, दाननिधी निर्माण करणे यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (२०१३ चा महा. १) अधिनियमित करण्यात आला आहे. या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, शासनाला काही तांत्रिक समस्यांना आणि व्यावहारिक अडचणींना तोड द्यावे लागले होते. अशा समस्यांवर आणि अडचणींवर मात करण्यासाठी, शासनाला उक्त अधिनियमात यथोचित सुधारणा करणे इष्ट वाटते.

२. ज्या तरतुदी करावयाच्या आहेत त्या तरतुदी स्थूलपणे पुढीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत :—

(क) उक्त अधिनियमाखाली यापुढे, पूर्व-प्राथमिक शाळांचे नियमन न करण्याबाबतच्या शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या हेतूने, उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या पोट-कलम (१) चा खंड (च) वगळण्याचे आणि तसेच, त्या अधिनियमाच्या इतर तरतुदींमध्ये परिणामस्वरूप सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(ख) प्रशासकीय दृष्टीकोनातून, शासनाकडे अर्ज करणे, छाननी समितीने अहवाल सादर करणे आणि शासनाने निर्णय कळविणे यासंबंधीच्या तारखांचे पुनर्वेळापत्रक आखता यावे म्हणून उक्त अधिनियमाची कलमे ३, ६ आणि ८ यांमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(ग) जेथे विकास आराखड्यामध्ये सक्षम प्राधिकरणाने अधिनियमाच्या अनुसूची ' क ' मधील नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र असलेला भूखंड शैक्षणिक प्रयोजनांसाठी राखून ठेवला असेल त्याबाबतीत जमिनीच्या क्षेत्राची अट शिथिल करण्यासाठी, आणि २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षाकरिता भूतलक्षी प्रभावाने, शासनाला अधिकार प्रदान करता यावा म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ३ मध्ये सुधारणा करणे.

(घ) उक्त अधिनियमाच्या कलम ४ मध्ये अशी तरतूद आहे की, अर्ज करण्याच्या वेळी दाननिधीची रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत ठेव म्हणून ठेवण्यात येईल, तथापि, आता, अशी रक्कम कोणत्याही बँकेत ठेव म्हणून ठेवण्यासाठी आणि इरादापत्र देण्यापूर्वी आणि २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षाकरिता १५ जुलै २०१३ पूर्वी राष्ट्रीयीकृत बँकेच्या उक्त आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(ङ) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) याच्या स्वयंस्पष्ट शिफारशींसह छाननी समितीचा अहवाल शासनाला सादर करण्याची तरतूद करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ६ मध्ये सुधारणा करणे.

(च) अनुसूची ' क ' च्या नोंद (११) अन्वये आवश्यक असलेले नोंदणीकृत दस्तऐवज हे, परवानगी देण्यासाठीचा अर्ज करण्याच्या वेळी सादर करण्याची अट शिथिल करून, तो इरादापत्र देण्यापूर्वी आणि २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षाकरिता १५ जुलै २०१३ पूर्वी सादर करण्याबाबतची तरतूद करणे.

(छ) परवानगी देण्याच्या किंवा ती नाकारण्याच्यासंबंधीच्या निर्णयाचे, २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षासह, पुनर्विलोकन करण्यासाठी शासनाला अधिकार प्रदान करण्याच्या हेतुने, उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये योग्य ती सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही व उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १ जुलै २०१३.

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. स. सहारिया,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.